जिल्हा परिषद क्षेत्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अस्थायी स्वरुपातील नियुक्त्या व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जिल्हा अंतर्गत बदल्यांचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मवैअ-१००९/प्र.क्र.१३/सेवा-३,
दिनांक : २९ जानेवारी , २००९.

<u>प्रस्तावना :-</u>

जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रामधील प्राथमिक आरोग्य केंद्रावर रुपये ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले अस्थायी वैद्यकीय अधिकारी संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा (परिमंडळ) यांनी नियुक्त केलेले आहेत. परंतु त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण मात्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे आहे. अशा परिस्थितीत सदर अधिकाऱ्यांविरुध्द त्यांच्या निष्काळजीपणाबद्दल योग्य ती कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद करु शकत नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेअंतर्गत अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे व बदलीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्याची आवश्यकता आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेली परिस्थिती विचारात घेऊन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

(१) जिल्हा परिषद क्षेत्रातील बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना अस्थायी स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. तथापि, अस्थायी बी.ए.एम.एस. पदवी अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निवडीसाठी खालील समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी.(सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य सचिव |

दिनांक २ जानेवारी,०८ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक १८ मार्च २००८ च्या पत्रान्वये अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आली आहे. हीच कार्यपध्दत सदर समितीने अनुसरावी.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपातील नेमणूकांबाबत दिनांक २३ जानेवारी २००८ च्या शासन निर्णयान्वये शासन धोरण आखले आहे, तेच धोरण सदर समितीमार्फत निवड होणाऱ्या अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना लागू राहील.

२) जिल्हा परिषद क्षेत्रातील बी.ए.एम.एस. व एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना राहतील. सदर अधिकार महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कार्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीस अनुसरुन जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( रा.का. पवार )
महाराष्ट्र शासनाचे सह सचिव.

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उप संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक,
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव/ कार्यासने